मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# संरक्षण विभागाच्या हद्दीतील रखडलेल्या पालखी मार्गाला गती मिळणार

## खासदार श्रीरंग बारणे यांचा लोकसभेत तारांकित प्रश्न : 'संरक्षण व सार्वजनिक बांधकाम विभागासोबत लवकरच बैठक; नितीन गडकरी यांची ग्वाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र देहूगाव ते देहूरोडपर्यंतचा साडेतीन किलोमीटर अंतराचा संरक्षण विभागाच्या हद्दीतील श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गाचे रुंदीकरण रखडले आहे. त्यामुळे वारकऱ्यांना पायी चालताना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. त्यासाठी तत्काळ संरक्षण विभागाकडून जागा ताब्यात घेऊन रखडलेल्या मार्गाचे काम सुरू करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत तारांकित प्रश्नाद्वारे केली. त्यावर याबाबत संरक्षण विभाग आणि राज्याच्या सार्वजनिक बांधकाम विभागासोबत लवकरच एकत्रित बैठक घेण्याची ग्वाही केंद्रीय रस्ते विकास व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. त्यामुळे रखडलेल्या मार्गाला गती मिळेल असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.




श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील पहिले साडेतीन किलोमीटर म्हणजे देहूगाव ते देहूरोड हे अंतर रुंदीकरण करणे फार महत्त्वाचे आहे. लष्कराच्या ताब्यात ही जमीन आहे, त्यामुळे येथे अडचणी आहेत. हा सुरुवातीचा टप्पा अतिशय कठीण आहे. तुकारामांची पालखी निघताना गाव लोटलेला असतो. यावेळेस या पालखी मार्गावरून बससेवा, वाहतूक आदी बंद ठेवावी लागते. त्याचा स्थानिक नागरिकांना खूप मोठा फटका बसतो. त्यामुळे देहूगाव ते देहूरोड हे अंतर रुंदीकरण करण्याची वारकऱ्यांची मागणी आहे.

याबाबत खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत तारांकित प्रश्नाद्वारे आवाज उठविला. ते म्हणाले, देहूगाव ते देहूरोड या साडेतीन किलोमीटर अंतराचा पालखी मार्ग संरक्षण विभागाच्या हद्दीतून जातो. या जागेचा ताबा राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. या जागेतील मार्गाचे रुंदीकरण रखडले आहे. यामुळे वारकऱ्यांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. हा रस्ता पंढरपूर वारीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या रस्त्यावर होणारी वाहतूक आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय अत्यंत गरजेचा आहे. रस्त्याच्या देखभालीसाठी तसेच वारीच्या पवित्र सोहळ्याच्या सोईसाठी रखडलेला मार्गाचे रुंदीकरण करणे भविष्यातील विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हा मार्ग कधीपर्यंत पूर्ण होईल. संरक्षण विभागासोबत जागेसंदर्भात काय कारवाई केली जाईल असा प्रश्न खासदार बारणे यांनी केला. त्यावर उत्तर देताना मंत्री नितीन गडकरी म्हणाले, रखडलेल्या पालखी मार्गाच्या रुंदीकरणाचे काम करण्यासाठी संरक्षण विभागाची परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याबाबत लवकरात लवकर संरक्षण विभागासोबत बैठक घेतली जाईल. राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाशीही चर्चा केली जाईल. त्यात मार्ग काढून काम पूर्ण केले जाईल.

### नितीन गडकरी यांचे अभिनंदन

» देहूतून पंढरपूरपर्यंत पालखी मार्ग जात आहे. त्यामुळे वारकऱ्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. वारकऱ्यांची गैरसोय दूर झाली आहे. पालखी मार्ग केल्याबद्द खासदार बारणे यांनी नितीन गडकरी यांचे लोकसभेत अभिनंदन केले.

" देहूगाव ते देहूरोडपर्यंत पालखी मार्गाच्या रखडलेल्या रुंदीकरणाबाबत लवकरच संरक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांशी बैठक घेण्याची ग्वाही मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. त्यामुळे जागेचा प्रश्न सुटून लवकरच प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल, असा विश्वास आहे.

- श्रीरंग बारणे, खासदार मावळ लोकसभा.

# पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचा शैक्षणिक सामंजस्य करार

## पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट आणि क्वांगवून विद्यापीठ यांच्या मध्ये नुकताच शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला

**पिंपरी | प्रतिनिधी**

दक्षिण कोरियातील क्वांगवून विद्यापीठ जागतिक पातळीवर उत्कृष्ट, दर्जेदार, आधुनिक विज्ञान तंत्रज्ञान शिक्षण देण्यासाठी नावलौकिक मिळवला आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) शैक्षणिक समूहातील संस्थेमधील विद्यार्थी, प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील उच्च शैक्षणिक संधी, संशोधन करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे असे मत दक्षिण कोरियाच्या क्वांगवून विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विभाग संचालक डॉ. सुंगवू बेंजामिन चो यांनी व्यक्त केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) आणि क्वांगवून विद्यापीठ यांच्या मध्ये नुकताच शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे झालेल्या कार्यक्रमात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारामुळे पीसीईटी येथे कोरियन भाषा केंद्र, अल्प मुदतीचे पदविका अभ्यासक्रम, द्विपक्षीय संशोधन, कार्यशाळा आयोजित करण्यास मदत मिळणार आहे.

यावेळी वुई ब्रिंगच्या मुख्य कार्यकारी अधिकारी टीना चो, क्वांगवून विद्यापीठातील इलेक्ट्रिकल आणि बायोलॉजिकल फिजिक्स आणि प्लाझ्मा बायोसायन्स रिसर्च सेंटर विभागाचे प्रा. नागेंद्रकुमार कौशिक, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीईटी आंतरराष्ट्रीय संबंध, संशोधन सल्लागार डॉ. दिनेश अमळनेरकर व विविध विद्याशाखेचे विभागप्रमुख उपस्थित होते.

क्वांगवून विद्यापीठा बरोबर झालेल्या या सामंजस्य करारामुळे पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे कोरियन भाषा केंद्र स्थापन करण्यात येणार असून या अंतर्गत विद्यार्थ्यांना कोरियन भाषा प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच सेमीकंडक्टर या विषया मधील संशोधनाला चालना देण्यासाठी सेंटर ऑफ एक्सीलेंस सुरु करण्यात येणार आहे. अल्पकालीन प्रशिक्षण अंतर्गत दोन ते सहा महिन्यांचे प्रशिक्षण हे या करारामधील वैशिष्ठ्य आहे. . कोरियात जाऊन, संशोधन करणे, शिक्षण संस्थांना भेटी देणे, पदवी, पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणे, शिक्षणाबरोबरच कोरियन संस्कृती, सामाजिक जडणघडण याची माहिती घेता येईल. त्याचप्रमाणे कोरियन विद्यार्थी पीसीईटी येथे येऊन शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांत सहभागी होतील. यामुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, कौशल्य विकास होण्यासाठी मदत होईल, असे डॉ. गिरीश देसाई म्हणाले.

# भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन 'किसान' मोशी येथे सुरू; 15 डिसेंबर पर्यंत आयोजन

## कृषि प्रदर्शनाचे उदघाटन प्रदर्शनाला येणाऱ्या शेतकऱ्यांच्या पहिल्या गटाच्या हस्ते करण्यात आले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

किसान' या भारतातील सर्वात मोठ्या कृषि प्रदर्शनाचे उदघाटन प्रदर्शनाला येणाऱ्या शेतकऱ्यांच्या पहिल्या गटाच्या हस्ते करण्यात आले. दिनांक ११ ते १५ डिसेंबर २०२४ दरम्यान पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्र, मोशी, पुणे येथे या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.



१५ एकर पसरलेल्या प्रदर्शनात ५०० हून अधिक कंपन्या, संशोधन संस्था व नवउद्योजक शेतीतील नवीन तंत्रज्ञान व उत्पादने सादर करतील. प्रदर्शनाच्या ५ दिवसांमध्ये देशभरातून एक लाखाहून अधिक शेतकरी भेट देतील असा अंदाज आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हे किसान प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

किसान प्रदर्शनाला शेती क्षेत्रातील मान्यवर संस्थांचा सहभाग व सहकार्य लाभले आहे. यंदा किसान प्रदर्शनात संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामुग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघु उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली आहेत. प्रत्येक दालनात त्या विशिष्ठ उद्योगातील कंपन्यांचे स्टॉल शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. शेतीसाठी लागणारी यंत्रे व उपकरणांचे प्रदर्शन खुल्या जागेत आयोजित केले आहे.

पूर्वनोंदणी : प्रदर्शनाच्या प्रवेशद्वारावर मोबाईल ॲपद्वारे आगाऊ नावनोंदणीची सोय केली आहे. ३०,००० हुन अधिक शेतकऱ्यांनी पूर्वनोंदणी केली असून ही संख्या १००,००० ओलांडण्याची अपेक्षा आहे.

किसान आता मोबाईलवरसुद्धा - प्रत्यक्ष प्रदर्शनातील सहभागासोबतच प्रदर्शक कंपन्या किसान ॲपवर त्यांच्या उत्पादनांची डिजिटल यादी देखील प्रसिद्ध करू शकतात. शेतकरी घरबसल्या विविध उत्पादनांविषयी माहिती मिळवू शकतात आणि त्यांच्या मोबाईलवर संबंधित व्हिडिओ पाहू शकतात. प्रदर्शक आणि अभ्यागत प्रत्यक्ष प्रदर्शनात भेटण्यापूर्वीच किसान ॲपच्या माध्यमातून परस्परांशी संवाद सुरू करू शकतात.

मातीमोल : या वर्षी किसानमध्ये मातीमोल हा मातीच्या आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारा उपक्रम साजरा केला जात आहे. आपली माती जिवंत आहे की नाही? यावर चर्चा सुरू करणे, मातीच्या आरोग्याविषयी शेतकरी समुदायामध्ये जागरूकता वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. चला आपल्या मातीची स्थिती अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊया, अर्थात मातीमोल जाणूया. हा उपक्रम जैवतंत्रज्ञान विभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सरेखित विभागांसोबत संयुक्तपणे आयोजित करण्यात येत आहे.

# महापालिका निवडणुकीबाबत संदिग्धता कायम

## पायाभूत सुविधांसाठी पुणेकरांचा संघर्ष, तक्रारींचा डोंगर, निधीच्या खर्चाचा ताळमेळ बसेना

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांना पायाभूत सुविधा मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. तक्रारींचा डोंगर उभा राहिला आहे. अनेक प्रकल्प रखडले आहेत. मंजूर केलेला निधी कसा, कुठे खर्च होत आहे, याचा ताळमेळ बसेनासा झालेला आहे. प्रशासन उत्तरदायी राहिलेले नाही. प्रशासकराज असल्याने नागरिकांच्या प्रश्न सोडविण्याऐवजी ठेकेदारांच्या भल्याचेच निर्णय घेतले जात असल्याचा आरोप पुणेकरांकडून केला जात आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांपेक्षा नागरिकांकडून महापालिकेच्या निवडणूक घेण्याची मागणी आता जोर धरु लागली आहे.



परंतु राज्य पातळीवरील हालचाली आणि न्यायालयाचा लांबलेला निर्णय यामुळे महापालिका निवडणुकीबाबत संदिग्धता कायम आहे.

लोकसभा आणि आता विधानसभेची निवडणुकीची रणधुमाळी पार पडल्यानंतर पुणे महापालिकेसह राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे. महायुतीसह महाविकास आघाडीने महापालिकेच्या निवडणुकीची तयार सुरु केली आहे. त्यामुळे प्रभागरचना कशी असेल यावर चर्चा रंगली असून प्रभाग चारचा की तीन राहणार यावरुन तर्कवितर्क लावले जात आहेत. मार्च-एप्रिल महिन्यात महिन्यात या निवडणुका पार पडतील, अंदाज लावला जात आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयातील ३० याचिकांवर एकत्रित निर्णय झाल्यास महापालिकांसह राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. तसेच या निवडणुका पावसाळ्यापूर्वी घेतला जातील, असा दावा आता राजकारणातील तज्ज्ञांसह पदाधिकारी करत आहेत.

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला २८८ मतदारसंघापैकी २३६ जांगावर दणदणीत विजय मिळाला आहे. त्यामुळे महायुतीला आता पोषक वातावरण आहे.

मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस विराजमान झाले आहेत. मंत्रिमंडळाचा विस्तारदेखील लवकर होणार आहे. तसेच येत्या १६ डिसेंबर पासून विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरु होणार आहे. एकूणच महायुतीला पोषक वातावरण असल्याने पुणे महापालिकेसह स्थानिक स्वारज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होतील, असा दावा केला जात आहे.

भारतीय जनता पक्षाने सदस्य नोंदणी सुरु केली असून महापालिकेच्या निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे संकेत दिले आहेत. तर इच्छुकांना निवडणुकीची तयारी करण्याचे आदेश शहराध्यक्षांनी दिले आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठका पार पडत आहेत. महाविकास आघाडी एकत्रित निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे नेत्यांनी पक्षाला सांगितले आहे. त्यामुळे महापालिकेची निवडणुकीचे बिगुल वाजणार असल्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे.

महाविकास आघाडी आणि त्यानंतर महायुती सरकारने आपल्या कार्यकाळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या होत्या. राज्यात सध्याच्या परिस्थितीत ९५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. नगरसेवकन सल्याने अनेक कामे रखडल्या आहेत. पायाभूत सुविधांपासून नागरिकांना वंचित राहवे लागत आहे. कामे होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. याचाच फटका अनेक उमेदवारांना बसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या रखडलेल्या निवडणुका तात्काळ घ्याव्या, अशी मागणी नागरिकांसह इच्छुक उमेदवारांकडून होऊ लागली आहे.

तत्कालीन देवेंद्र फडणवीस सरकारने २०१७ मध्ये महापालिकांच्या निवडणुका या चार सदस्यीय प्रभागरचनेनुसार लढविल्या होत्या. भाजपला त्याचा राज्यभर फायदा झाला होता. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर महाविकास आघाडी सरकारने तीन सदस्यीय प्रभागरचना करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महापालिका निवडणुकांची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

### पुन्हा नव्याने प्रभागरचना होणार?

**» पुणे महापालिकेसाठी तीन सदस्यांची प्रभागरचना करण्यात आली होती. त्यात बदल करुन चार सदस्यांचा प्रभाग करण्यात आला होता. ही प्रभागरचना करताना पुणे महापालिकेच्या हद्दीत फुरसुंगी आणि उरुळी देवाची या गावांचा समावेश होता. परंतु आता ही दोन गावे महापालिकेतून वगळण्यात आली असून स्वतंत्र नगरपालिका स्थापन केली जाणार आहे. त्यामुळे आता पुणे महापालिकेसाठी नव्याने प्रभागरचना करावी लागणार आहे. यामध्ये किमान सहा महिन्यांचा कालावधी लागू शकतो. असे सले तरी निवडणूक आयोगाच्या आदेश आल्यानंतर महापालिकेत वेगाने घडामोडी घडतील.**

# नवनियुक्त आमदारांचा पहिल्याच बैठकीत कामांचा झपाटा...

## विकासकामांना गती देत कामे त्वरित मार्गी लावण्याचे आ. सुनील शेळके यांचे अधिकाऱ्यांना आदेश..

**पिंपरी | प्रतिनिधी**

ज्या कामांना निधी उपलब्ध आहे अथवा जी कामे अर्धवट अवस्थेत आहेत, त्या कामांना गती देऊन कामे पूर्ण करावीत, असे आदेश आमदार सुनील शेळके यांनी अधिकाऱ्यांना दिले.



महसूल विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, वन विभाग, महावितरण आणि पंचायत समितीच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व विभागांची आढावा बैठक आमदार शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीत वडगाव मावळ येथे झाली. यावेळी जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजना, शाळा दुरुस्ती, शासकीय योजनांची अंमलबजावणी, रस्ते, स्मशानभूमी, पूल या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस तहसीलदार विक्रम देशमुख, नायब तहसीलदार गणेश तळेकर, गटविकास अधिकारी के. के. प्रधान, गणेश ढोरे, माजी सभापती विठ्ठलराव शिंदे, साहेबराव कारके, सहायक गटविकास अधिकारी एस. डी. थोरात, पोलिस निरीक्षक सुहास जगताप, प्रदीप रायण्णावर, रणजित जाधव, विजय वाघमारे, कुमार कदम, रवींद्र पाटील, तेजस्विनी कदम तसेच सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी, ग्रामसेवक, मंडल अधिकारी उपस्थित होते.

वडेश्वर येथे नवीन वीज उपकेंद्र उभारण्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे. या कामास सुरुवात करण्यात यावी. कोल्हापूरी पद्धतीचे बंधारे व पुलांची कामे करून पूल वाहतुकीस खुले करावेत. जुन्या बंधाऱ्यातील पाणी गळती रोखण्यासाठी दुरुस्तीचे प्रस्ताव द्यावेत, असे आदेश देण्यात आले आहेत.

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी मावळ तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात. स्थानिक हॉटेल्स व छोटे व्यावसायिक पर्यटकांवर अवलंबून असल्याने त्यांचे नुकसान होणार नाही, याची प्रशासनाने काळजी घ्यावी. कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. याबाबत स्थानिक व्यावसायिक, नागरिक व पर्यटक यांना दक्षता घेण्याचे आवाहन करावे, अशा सूचना पोलिस यंत्रणेला दिल्या. कामशेत, वडगाव फाटा, देहूरोड, सोमाटणे, लोणावळा येथील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी ठोस पावले उचलावीत, असे आदेश वाहतूक विभागाला दिले.

# पुणे-नाशिक महामार्गावरील चेंबरची दुरुस्ती करण्याची मागणी

## चेंबरची झाकणे तुटल्याने अपघातजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-नाशिक महामार्गावरील श्री नागेश्वर महाराज उपबाजार समिति ते टोल नाका दरम्यानच्या रस्त्यावर असलेल्या आठ ते दहा चेंबरची झाकणे गायब झाली आहेत. काही झाकणे तुटल्याने अपघातजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक झाला आहे.

या बिगर झाकणाच्या चेंबरमुळे पादचारी नागरिक व वाहनचालकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. महापालिकेने त्वरित या झाकणांची दुरुस्ती करून घ्यावीत, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

पावसाळ्यात या रस्त्यावर गुडघ्यापर्यंत पाणी साचत असते. पाण्यामुळे नागरिकांना या ठिकाणी असलेले चेंबर दिसत नाहीत. त्यामध्ये चेंबरला झाकण नसल्याने एखादी व्यक्ती अथवा वाहन अडकून अपघात होऊ शकतो.

त्यामुळे महापालिकेने चेंबरची सर्व झाकणे त्वरीत बदलून, रस्ता सुस्थितीत करावा. अशी मागणी स्थानिकांमधून होत आहे.

रस्त्यावर असलेल्या आठ ते दहा चेंबरची झाकणे गायब झाली आहेत. काही झाकणे तुटल्याने अपघातजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी धोकादायक झाला आहे. या बिगर झाकणाच्या चेंबरमुळे पादचारी नागरिक व वाहनचालकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. महापालिकेने त्वरित या झाकणांची दुरुस्ती करून घ्यावीत, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# महापालिकेच्या प्रमुख सेवांचे डिजिटलायझेशन!

## आयुक्त शेखर सिंह यांची ग्वाही : प्रशिक्षणार्थी सनदी अधिकाऱ्यांची महापालिकेच्या विविध प्रकल्पांना भेट

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेने प्रमुख सेवांचे डिजिटलायझेशन करत प्रगती केली आहे. सार्वजनिक सेवेचे वितरण आणि पारदर्शकता वाढवला आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून प्रमुख सेवांचे डिजिटलायझेशन करून नागरिकांना अधिक सुलभ आणि जलद गतीने सेवा देण्यासाठी पालिका कटिबद्ध आहे, अशी ग्वाही आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. केंद्रीय नागरी सेवेतील प्रशिक्षणार्थी सनदी अधिकाऱ्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध प्रकल्प आणि उपक्रमांना भेट दिली. या अधिकाऱ्यांशी आयुक्त शेखर सिंह यांनी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांच्यासह भारतीय पोलीस सेवा, भारतीय रेल्वे वाहतूक सेवा, भारतीय महसूल सेवा, भारतीय माहिती सेवा, भारतीय टपाल सेवा, भारतीय लेखापरिक्षण व लेखा सेवा, भारतीय नागरी लेखा सेवा, भारतीय कॉर्पोरेट कायदा सेवा, भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांचा समावेश होता.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, महापालिकेचा ऑनलाइन कर भरणा, ऑनलाइन विवाह नोंदणी, जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्र सुविधा, समाजविकास विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा, लॉगिन आयडीचा वापर करून नागरिकांच्या सोयीसाठी तक्रार निवारण यंत्रणा, महापालिका कार्यालये तसेच स्मार्ट टॉयलेट शोधण्यासाठी जीपीएस यंत्रणेचा वापर, आपत्कालीन वेळेत संपर्क साधण्यासाठी मदत कार्य, स्थानिक अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी पुढाकार, वेबिनारचे आयोजन, महापालिकेच्या आरोग्य अभियानांची माहिती आदी सुविधांचा ई-गव्हर्नन्स प्लॅटफॉर्ममध्ये समावेश केल्याने नागरिक कोणत्याही अडथळ्याशिवाय थेट प्रशासानाशी संवाद साधू शकतात. या डिजिटल साधनांमुळे केवळ कार्यक्षमतेत वाढ झाली नसून सर्वसमावेशकतेमध्येही सुधारणा झाली आहे.

डिजिटलायझेशनच्या दिशेने चालू असलेला हा प्रवास शाश्वत शहरी विकासासाठी असलेली महापालिकेची वचनबद्धता दर्शवतो, असे ते म्हणाले. जमिनीवरील भूक्षेत्राचे मोजमाप तसेच जमीनीखालील विविध वाहिन्यांची माहिती जीआयएस प्रणालीद्वारे उपलब्ध करून घेण्याच्या उपक्रमाला देखील महापालिकेने सुरूवात केली आहे. त्यामुळे शहराचे भविष्यातील नियोजन करताना या सर्व तंत्रज्ञानयुक्त उपक्रम आणि प्रकल्पांचा महापालिका प्रशासनाला उपयोग होतो. सद्यस्थितीत शहरात वाहतुक कोंडीची समस्या उद्भवत असून त्यावर उपाययोजना करण्यासाठी पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून महापालिकेने आराखडा तयार करण्यास सुरूवात केली आहे. इंडिग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर (आयसीसीसी) च्या माध्यमातून शहरातील विविध भागांवर देखरेख आणि नियंत्रण ठेवण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे, अशी माहिती आयुक्त सिंह यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे वेस्ट टू एनर्जी, इंडिग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर, हरित सेतू, वेस्ट टू बायोगॅस तसेच दिव्यांग भवन हे नाविन्यपुर्ण उपक्रम इतर महापालिकांसाठी पथदर्शी उपक्रम ठरत आहेत. उपस्थित सनदी अधिकाऱ्यांनी अशाच प्रकारे त्यांना नेमून दिलेल्या ठिकाणी नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना आवश्यक सोयी सुविधा सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी तसेच एकूणच शाश्वत विकास साधण्यासाठी कार्य करावे, अशा शब्दांत आयुक्त शेखर सिंह यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


# श्री मोरया गोसावी समाधी महोत्सव मंगळवारपासून

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहनजी भागवत यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**पिंपरी | प्रतिनिधी**

श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज संजीवन समाधी सोहळा १७ ते २१ डिसेंबर २०२४ या कालावधीत चिंचवड येथे साजरा होणार आहे. सोहळ्यादरम्यान धार्मिक कार्यक्रम व उपशास्त्रीय व सुगम संगीत, तसेच व्याख्यानासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्याचे यंदाचे ४६३ वे वर्ष आहे. याबाबतची माहिती ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव यांनी दिली.





### डॉ. रघुनाथ माशेलकर यांना जीवन गौरव पुरस्कार

» यंदाचा श्री मोरया गोसावी महाराज जीवन गौरव पुरस्कार पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांना जाहीर करण्यात आला आहे. २० डिसेंबर रोजी पंडितप्रवर गणेश्वरशास्त्री द्राविड यांच्या हस्ते डॉ. माशेलकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

चिंचवड देवस्थान ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि चिंचवड ग्रामस्थांच्या वतीने आयोजित महोत्सवाचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या शुभहस्ते १७ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता होणार आहे. महोत्सवानिमित्त १७ ते २१ डिसेंबर या कालावधीत रोज सकाळी सहा वाजता नितीन दैठणकर यांचे समाधी मंदिर येथे व श्री तुकाराम दैठणकर यांचे श्रीमंगलमूर्ती वाडा येथे सनई-चौघडा वादन होईल. मोरया गोसावी महाराज चरित्र पठण, वेदमूर्ती श्री रबडे गुरुजी यांचा लक्ष्मी-नारायण याग होईल. १७ डिसेंबर रोजी सोहळ्याच्या उद्घाटननंतर अपर्णा कुलकर्णी यांचे 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या विषयावर व्याख्यान होणार आहे. रात्री साडेआठ वाजता पंडित संजीव अभ्यंकर यांचा 'स्वरसंजीवन' हा गायनाचा कार्यक्रम होईल. १८ डिसेंबर रोजी सायंकाळी चार वाजता शरदबुवा घाग यांचे कीर्तन, सायंकाळी सहा वाजता महासाधू श्री मोरया गोसावी महाराज यांनी रचलेल्या पदांवर आधारित 'माझ्या मोरयाचा धर्म जागो' हा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर पंडित जयतीर्थ मेवूंडी व सहकलाकार यांचा 'भक्ती संगीत व अभंगवाणीचा' कार्यक्रम होईल.

तर, १९ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता अविनाश धर्माधिकारी यांचे 'टिळक पर्व' या विषयावर व्याख्यान होईल. आहे. रात्री साडे आठ वाजता बेला शेंडे व सहकलाकार, सुगम संगीताचा कार्यक्रम सादर करणार आहेत. २० डिसेंबर रोजी आरोग्य व रक्तदान शिबिर होईल. सायंकाळी पं.शाहीद परवेझ- सतार, पं.राजस उपाध्ये- व्हायोलीन, पं.विजय घाटे- तबला यांचा कार्यक्रम होईल. २१ डिसेंबर रोजी पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे संजीवन समाधी सोहळ्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होईल, असे मंदार महाराज देव यांनी सांगितले.

चिंचवड देवस्थानच्या शेकडो एकर जागेवर ताबे मारले आहेत. याबाबत पन्नासहून अधिक प्रकरणांची सुनावणी धर्मादाय आयुक्तालयाकडे सुरू असल्याचे चिंचवड देवस्थानचे विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप यांनी सांगितले.

# नदीपात्रात अडथळा ठरणारा पूल पाडणार

## रिद्धेश्वर-सिद्धेश्वर घाटाला जोडणारा 'कॉजवे' वाहतुकीसाठी झाला धोकादायक

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील मध्यवर्ती भागातील प्रसिद्ध असलेल्या ओंकारेश्वर मंदिराच्या जवळ असलेला पूल पाडण्याचा विचार महापालिकेने सुरू केला आहे. सर्व बाबींचा अभ्यास करून याबाबतचा प्रस्ताव पुणे महानगरपालिका प्रशासनाने मंजुरीसाठी ठेवला आहे.

बालगंधर्व रंगमंदिरापासून पुढे गेल्यानंतर शनिवार पेठेकडे जाताना जुने असे ओंकारेश्वर मंदिर आहे. नारायण पेठ तसेच डेक्कन परिसरातून नदीपात्रातून पुणे महानगरपालिकेकडे जाताना वाहन चालकांना ओंकारेश्वर मंदिरावरून जावे लागते. काही वर्षांपूर्वी नागरिकांना नदीच्या पलीकडे ये – जा करता यावी यासाठी ओंकारेश्वर ते वृद्धेश्वर-सिद्धेश्वर घाटाला जोडणारा पूल बांधण्यात आला आहे. हा नदीपात्रातील पूल पाडण्याचा निर्णय आता महापालिकेने घेतला आहे. हा पूल धोकादायक झाला असून, नदीपात्रातील पाण्याला अडथळा ठरत आहे. त्यामुळे हा पूल पाडण्याची तयारी पालिकेने केली आहे. याबाबतचा प्रस्ताव शहर सुधारणा समितीमध्ये मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे.



मुठा नदीपात्रात सुमारे ५५ वर्षांपूर्वी हा पूल बांधण्यात आला आहे. या पुलाचा वापर स्थानिक नागरिक वाहने धुणे, मासे पकडणे, तसेच प्राण्यांच्या स्वच्छतेसाठी करतात. वाहतुकीसाठी पुलाचा वापर होत नाही. दर वर्षी पावसाळ्यात या पुलामुळे जलपर्णी आणि कचरा अडकला जातो. हा पूल जीर्ण झाला असून, तो वापरासाठी सुरक्षित नाही. त्यावर वारंवार खड्डे पडतात.

या पुलाच्या दुरुस्तीसाठी मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या पुलाचे लेखापरीक्षण करण्यात आले. त्यात पुलाच्या दुरुस्तीसाठी ३९ लाख रुपयांचा खर्च येणार आहे. या खर्चानंतर पुलाचे आयुर्मान केवळ ८ वर्षे वाढणार आहे. नदीपात्रातील पाण्याच्या प्रवाहाला अडथळा ठरणारा हा पूल पाडल्यानंतर त्याचा फायदा महापालिकेच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या नदीकाठ विकसन प्रकल्पाबरोबरच पूरस्थितीच्या काळात होणार आहे.

पावसाळ्यात या पुलाच्या खांबाला कचरा, पाण्याबरोबर वाहून आलेली जलपर्णी अडकते. त्यामुळे पाणी वाहून जाण्यासाठी अडथळा निर्माण होतो. पूल पाडल्यानंतर पाण्याच्या प्रवाहाला होणारा अडथळा दूर होणार आहे.

### दुरुस्तीसाठी लागणार 39 लाख रुपये

**» या पुलाची लांबी ५० मीटर, तर रुंदी अवघी ४.७ मीटर इतकी आहे. हा पूल बांधल्यानंतर महापालिकेने शेजारीच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल आणि जयंतराव टिळक पूल बांधले आहेत. या दोन्ही पुलांचा वापर होत असल्याने तसेच ३९ लाख रुपयांच्या खर्चानंतरही या पुलाचा वापर फारसा होणार नसल्याचे लक्षात आल्याने हा पूल पाडण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या प्रकल्प विभागाने तयार करून तो शहर सुधारणा समितीच्या मान्यतेसाठी ठेवला आहे. स्थायी समिती आणि मुख्य सभेची मान्यता घेऊन हे काम केले जाणार आहे.**

# भीमेवरील कुगाव ते शिरसोडी पुलाचे काम सुरू

## व्यापार, दळणवळणात वाढ होणार : अनेक वर्षांपासून भीमा नदीवर जोडपूल करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील शिरसोडी ते सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील कुगाव या भीमा नदीवरील पुलाच्या कामाला सुरुवात झाल्याने करमाळा व इंदापूर तालुक्यातील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. या पुलामुळे उजनी धरणातील पर्यटनाला चांगली चालना मिळण्यास मदत होणार आहे. इंदापूर शहरातील बाजारपेठेतील व्यापारवाढीसाठीही या पुलामुळे वाढणाऱ्या दळणवळणाचा फायदा होईल.

उजनी धरण पाणलोट क्षेत्रात करमाळा तालुक्यातील गावांना इंदापूर तालुक्यातील हाकेच्या अंतरावर असणाऱ्या गावात जाण्यासाठी रस्ते मार्गाने 80 ते 90 कि.मी. भिगवण, टेंभुर्णी येथून वळसा घालून किंवा जीव धोक्यात घालून जलमार्गाने प्रवास करावा लागतो. आत्तापर्यंत जलवहातुकीमध्ये 40 हून अधिक प्रवाशांना जलसमाधी मिळाली आहे. उजनी जलाशयात भीमा नदीवर जोडपूल करण्याची मागणी त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून उजनीकाठच्या लोकांची होती. इंदापूर येथील व्यापाऱ्यांनीही या पुलाची मागणी केली होती.



माजी राज्यमंत्री, आमदार दत्तात्रय भरणे यांनी याची दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून तसेच विधानसभेत याचा पाठपुरावा करून विधानसभा निवडणुकीपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या पुलाच्या कामाला मंजुरी देऊन 23 ऑगस्ट 2024 रोजी भूमिपूजन केले होते.

आता या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाल्याने दोन्ही काठच्या ग्रामस्थांतून समाधान व्यक्त होत आहे. तिन्ही बाजूंनी 30 किलोमीटर पाण्याने वेढलेल्या हनुमान जन्मग्राम असा उल्लेख असलेल्या कुगावसह परिसरातील इतरही गावांना इंदापूर तालुक्यातील गावांशी दळणवळणाचा प्रश्न बिकट होता, हा पूल झाल्यानंतरही मोठी अडचण दूर होणार आहे. हा पूल झाल्यावर पर्यटन, मत्स्य व्यवसाय, पक्षी निरीक्षण, कृषी व दळणवळण व्यवस्था बळकट करण्यासाठी चालना मिळणार आहे.

### असा आहे पूल

**» कुगाव ते शिरसोडी दरम्यान उजनी बॅकवॉटर पात्रात 1320 मीटरचा पूल असून कुगाव बाजूला 420 मीटर तर शिरसोडी बाजूला 250 मीटरचा भराव आहे. या पुलासाठी राज्य शासनाने 394 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली असून, 284 कोटी 53 लाखांची ई-निविदा देखील काढली होती. मे. टी. अँन्ड टी पुणे या कंपनीला 307 कोटी रुपयांचा ठेका मिळाला असून 900 दिवसांत काम पूर्ण करण्याची अट टाकण्यात आली आहे.**

“ पुलाचे काम दर्जेदार व्हावे यासाठी दोन्ही बाजूचे नागरिक योग्य दक्षता घेत आहेत. इंदापूर, माढा, करमाळा तालुक्यास वरदान ठरलेल्या उजनी धरण परिसरात सुरक्षित जलवाहतूक, उजनी पाणलोट क्षेत्रात येणाऱ्या 350 हून जास्त प्रकारच्या पक्षांचे निरीक्षण करण्यासाठी पक्षी निरीक्षण केंद्र, उजनी धरण क्षेत्रात पर्यटन आदी बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून या परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबध्द आहे.

**- दत्तात्रय भरणे, माजी राज्यमंत्री, आमदार इंदापूर.**